जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४७०** **दिनांक - ०८/११/२०२४**

खडकी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## खडकी पोलीस स्टेशन कडून गांजा कारवाईचा डबल धमाका २,८१,२२०/- रु किं.चा गांजा व रिक्षा जप्त गांजा विक्री करणा-यांच्या रिक्षावर खडकी पोलीस स्टेशन कडून छापा

दि.०७/११/२०२४ रोजी खडकी पोलीस स्टेशन कडील मरीआई बीट मार्शल हे पेट्रोलिंग करत करत पुणे मुंबई जुना हायवे वरील कामगार आयुक्तालयासमोर थांबलेल्या रिक्षा जवळून जात असताना त्यांना गांजाचा वास आला म्हणून त्यांनी रिक्षाची तपासणी केली असता त्यामध्ये बसलेला इसम अफजल सनाउल्ला सय्यद वय ३९ वर्षे,रा.सर्वे नं.२३०,सनराईज बेकरीच्या पाठीमागे,पुणे मूळ गांव मु.पो.दिघीहाटी,ता.वेल्हा,जि.पुणे याचे ताब्यातुन **२,८१,२२०/- रु किं.चा ५ किलो ६३० ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ व रिक्षा जप्त** करून त्याचे विरुध्द खडकी पोलीस स्टेशन गु.र.नं. ३१५/२०२४, एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क ),२०(ब)ii (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

खडकी पोलीस स्टेशनने दि.०२/११/२०२४ रोजी सुध्दा एस.टी.बस मधून गांजाची वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करून ०२ आरोपींकडून १,५९,१५०/-रु.किं.चा गांजा जप्त १० किलो ६१० ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला होता.

सदरील कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ ४,पुणे शहर श्री.हिंमत जाधव, मा.सहा पोलीस आयुक्त, खडकी विभाग,पुणे श्रीमती अनुजा देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर कडील श्री.सतिश जगदाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.गजानन चोरमले, पोलीस उपनिरीक्षक दिग्विजय चौगले, पोलीस उपनिरीक्षक अर्जुन बेंदगुडे पोलीस अंमलदार आशिष पवार,संदेश निकाळजे,शिवराज खेड,बीट मार्शल अंमलदार सुधाकर राठोड,सुधाकर तागड,यांनी केली आहे.